**<u>प्रसिध्दी पत्रक</u>** **दिनांक:-05/12/2020**

**रत्नमाला बजरंग क्षीरसागर, महिला पोलीस नाईक, जिल्हा विशेष शाखा, उस्मानाबाद यांनी 300/- रुपये लाच रक्कम स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग उस्मानाबाद च्या जाळयात**

| | |
|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नाव, हुद्दा व पत्ता | रत्नमाला बजरंग क्षीरसागर, महिला पोलीस नाईक, जिल्हा विशेष शाखा, उस्मानाबाद |
| गुन्हयाचा दिनांक व ठिकाण | दि.05.12.2020 रोजी पोलीस मुख्यालय उस्मानाबादचे कवायत मैदानावरील चारित्र्य प्रमाणपत्र वाटप कार्यालयात |
| तपासी अधिकारी | श्री.अशोक हुलगे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.विभाग, उस्मानाबाद |
| लाचेची रक्कम मागणी | 300/- रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांना चारित्र्य प्रमाणपत्र देण्यासाठी |

यातील तक्रारदार हे शिक्षण घेत असुन त्यांची इंडियन आर्मीमध्ये निवड झाल्याने त्यांना चारित्र्य प्रमाणपत्राची आवश्यकता होती त्यासाठी त्यांनी ऑनलाईन अर्ज केला होता. सदरच्या अर्जावरुन चारित्र्य प्रमाणपत्र देण्यासाठी पोलीस अधीक्षक कार्यालयातील जिल्हा विशेष शाखेअंतर्गत असलेले चारित्र्य पडताळणी कार्यालयातील महिला पोलीस क्षीरसागर यांनी तक्रारदार यांचेकडे 300/- रुपये लाचेची मागणी केली होती. तक्रारदार यांना महिला पोलीस क्षीरसागर यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने त्यांनी दि.05.12.2020 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,उस्मानाबाद येथील पोलीस निरीक्षक श्री.अशोक हुलगे यांचेकडे तक्रार दिली होती.

सदर तक्रारीचे अनुषंगाने महिला पोलीस क्षीरसागर यांची लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, त्यांनी तक्रारदार यांच्याकडे वरील नमुद कामासाठी पंचासमक्ष 300/-रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम लागलीच स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद तर्फे आज दि.05.12.2020 रोजी सापळा आयोजीत केला असता रत्नमाला बजरंग क्षीरसागर, महिला पोलीस नाईक, नेमणुक जिल्हा विशेष शाखा, उस्मानाबाद यांनी पोलीस मुख्यालय येथील कवायत मैदानावरील चारित्र्य प्रमाणपत्र वाटप कार्यालयामध्ये तक्रारदार यांच्याकडुन लाचेच्या मागणीप्रमाणे 300/- रुपये लाच रक्कम स्विकारल्यानंतर त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले. यावरुन त्यांचेविरुध्द पोलीस ठाणे आनंद नगर, उस्मानाबाद येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई मा. पोलीस अधीक्षक डॉ.राहुल खाडे, मा.अपर पोलीस अधीक्षक डॉ.अनिता जमादार, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद व श्री.प्रशांत संपते, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग उस्मानाबाद यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.अशोक हुलगे, पोलीस निरीक्षक यांनी केली असुन सदर कारवाईस पोना/जाधव, पोकॉ/बेळे, तावसकर, आचार्य यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणताही शासकीय अधिकारी/कर्मचारी 1) महाराष्ट्र शासनाचे मानधन, अनुदान घेणारी व्यक्ती 2) खाजगी इसम शासकिय कामाकरिता अथवा शासकीय काम करुन दिले बद्दल लाचेची मागणी करीत असतील तर कृपया खालील मोबाईल, दूरध्वनीवर, टोल फ्री क्रमांकावर, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे **<u>मोबाईल ॲप्सद्वारे www.acbmaharashtra.net</u>** या संकेतस्थळावर तक्रारी नोंदविण्यासाठी संपर्क साधावा.

**मोबाईल क्रमांक :-**

**1)** मा.डॉ.राहुल खाडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.विभाग, औरंगाबाद मोबाईल क्रं. 8888807299

**2)** श्री.प्रशांत संपते, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.विभाग, उस्मानाबाद मो.नं. 9527943100

**3) टोल फ्री क्र. 1064**, दूरध्वनी क्र.- 02472-222879

**<u>E-Mail ID:-</u>** dysposmanabad@gmail.com

कार्यालय पोलीस उप अधीक्षक, ... करप्शन ब्युरो, उस्मानाबाद

**(प्रशांत संपते)**
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,उस्मानाबाद.